

# विद्यावार्ता®

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Peer Reviewed International Refereed Research Journal

Issue-34, Vol-03 April to June 2020

Peer-Reviewed
25

Editor
Dr.Bapu G.Gholap

13) Digital Information Needs for Faculty of Vidyavardhaka First Grade College... ||62
Sunil Kumar R., Mysuru

14) ATROCITIES AND DALIT WOMEN: WITH SPECIAL REFERENCE TO GADHINGLAJ ... ||65
Vijay B. Musai, Dist. Kolhapur

15) भारतातील बुडीत बँका व गुतंवणुक संधी ||69
डॉ. वाकळे गोरखनाथ एकनाथ, नाशिक

16) दलित आत्मकथने आणि सामाजिकता ||72
प्रा.डॉ. आनंद वारके, जि. कोल्हापूर

17) विजेची बचत काळाची गरज ||75
प्रा. गायत्री चवाळे, अमरावती

18) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार ||80
प्रा. डी. जी. चिघळीकर, गडहिंग्लज

19) मराठेकालीन हेरवाड ग्राममधील भुईकोट किल्ला : एक ऐतिहासिक अभ्यास ||83
डॉ. डी. व्ही. सुर्यवंशी, कुरुंदवाड

20) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रगती आणि आव्हाने ||86
डॉ. ए. वाय. जाधव, चंदगड

21) बुलडाणा जिल्हयातील प्राथमिक शाळेत राबविण्यात येत असलेल्या 'बालकांचा ... ||90
डॉ. कनिज फातिमा & सुधीर यशवंता खिल्लारे, औरंगाबाद

22) ग्रामीण जनतेच्या विकासाकरीता आधुनिक पध्दतीने दुग्ध व्यवसाय व व्यवस्थापन ||94
प्रा.डॉ. मधुकर नक्षीणे, गडचिरोली

23) भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषीक्षेत्राचे घटते मूल्य ||99
प्रसाद पांडुरंग दावणे, कोल्हापूर

24) ऐतिहासिक पर्यटनामध्ये महाराष्ट्रातील किल्ल्याचे योगदान ||102
प्रा.डॉ. सातपुते आर. बी., सातारा

25) समाज परिवर्तन चळवळीतील माणगांव परिषदेचे ऐतिहासिक महत्व ||106
प्रा. राहुल शंकर कांबळे, जि. सांगली

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

18

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार

प्रा. डी. जी. चिघळीकर
अर्थशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज

**********

बोधिसत्व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपण भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखत असलो तरी, त्यांचे व्यक्तीमत्व अष्टपैलू होते. कायदेतज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानव वंशशास्त्रज्ञ, राज्यकीय विश्लेषक, राजकारणी, पत्रकार, लेखक, संपादक, समाज सुधारक, धर्मसुधारक, आंदोलक, दलित, शोषीत, पीडीत, उपेक्षीत आणि वंचित समाजाच्या उत्थानासाठी अखंड आयुष्यभर प्रस्थापीत व्यवस्थेशी झगडनारा महानायक अशी ओळख संबंध जगाला आहे. तरीही मुलतः ते एक अर्थतज्ञ होते. त्यांच्या आर्थिक विचारा शिवाय भारतीय अर्थशास्त्राचा परिघ पूर्ण होत नाही. ६ डिसेंबर हा त्यांचा महापरिनिर्वाण दिन, महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून, त्यांना अभिवादन करण्याच्या हेतूने, त्यांच्या आर्थिक विचारांची आणि विशेषतः कृषी विषयक विचारांची चर्चा सदर लेखामध्ये करण्यात आलेली आहे.

आज देशातील शेती आणि शेतकरी पूर्णतः धोक्यात आलेला आहे. शेती आणि शेतकरी उध्वस्थ होण्याच्या उंबरटयावर येवून ठेपलेला आहे. कुठल्याही परिस्थीतीत त्याला सावरणे अत्यंत गरतेचे आहे. ही गोष्ट लक्षात घेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जवळपास शंभर वर्षापूर्वी यासंदर्भात केलेल्या विचारांची चर्चा आजही उपयुक्त आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले उच्च शिक्षण 'अर्थशास्त्र' विषयातूनच पूर्ण केलेले आहे. सन १९१५ साली अमेरिकेच्या कोलंबीया विद्यापीठातून एम. ए. ची पदवी, तसेच १९१७ साली पीएच. डी. ची पदवी तर, सन १९२१ साली लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून घेतलेली 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही सर्वोच्च पदवी देखील अर्थशास्त्र हाच विषय घेवून पूर्ण केली.

एम. ए. च्या पदवीसाठी त्यांनी 'अॅडमिनिस्ट्रेशन अॅन्ड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी' या विषयावर शोधप्रबंध सादर केला होता. त्यात त्यांनी सन १७९२ त १८५८ या कालखंडातील ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्त व्यवस्थेचा परिणाम म्हणून भारतीय जनतेवर झालेल्या अन्यायाची व शोषणाच्या स्वरूपाची मांडणी केली. पीएच. डी. च्या पदवीसाठी त्यांनी 'दि इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शिअल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया' या विषयावर शोधप्रबंध सादर केला. त्यात त्यांनी सन १८३३ ते १९२१ या कालखंडात ब्रिटीश केंद्रसरकार व त्यावेळची घटकराज्ये यांच्यातील आर्थिक संबंधावर सविस्तर चर्चा केली.

'डॉक्टर ऑफ सायन्स' च्या पदवीसाठी त्यांनी 'दि प्रॉब्लेम ऑफ रूपी' इट्स ओरिजिन अॅन्ड सोल्यूशन' हा शोधप्रबंध सादर केला. या प्रबंधामध्ये त्यांनी भारतासाठी आदर्श चलन पध्दती कोणती ? याची सविस्तर मांडणी करून, चलननिर्मिती करणाऱ्या यंत्रणेवर मर्यादा घालण्यासाठी मध्यवर्ती बॅंकेची आवश्यकता व्यक्त केली. हिच भूमीका त्यांनी १९२६ साली हिल्ट्न यंग कमीशन समोर मांडली. पुढे त्यातूनच भारतीय रिझर्व बॅंकेची स्थापना करण्यात आली.

या बरोबरच अॅनहिलेशन ऑफ कास्ट, व्हॉट कॉंग्रसे अॅड गांधी हॅव डन टू अनटचबल्स, बुध्दिझम अॅन्ड कम्युनिझम या ग्रंथांमध्ये व त्यांच्या भाषणांमधून जाती व्यवस्थेच्या अर्थशास्त्राची कल्पना येते.

तर स्मॉल होल्डींग्ज इन इंडीया अॅन्ड देअर रेमीडीज, स्मॉल होल्डस रिलीफ बील, अॅबॉलीस द खोती सिस्टीम, आणि स्ट्ट्स अॅन्ड मायनॉरिटीज मधून शेती विषयक विचारांची ओळख होते.

''स्मॉल होल्डींग्ज इंन इंडीया अॅन्ड देअर रेमीडीज'' हा शोधनिबंध सन १९१८ साली 'जर्नल ऑफ इंडीयन इकॉनॉमीक सोसायटी' मध्ये प्रसिध्द झाला. आपल्या शोधनिबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील अल्पभूधारना क्षेत्राच्या समस्यांची चर्चा

करून उपाय योजना सुचवल्या आहेत. यामध्ये बाबासाहेब म्हणतात की, लहान धारणक्षेत्र ही भारतीय शेतीला भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे. तसेच ही लहान धारणक्षेत्रे विखुरलेली असल्यामुळे ती समस्या अधिक बिकट झालेली आहे. या संदर्भातील काही उदाहरणे देवून त्यांनी ही समस्या अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पुण्या शेजारच्या पिंपाला सौदागर येथे अवघे दोन एकर एवढेच धारणक्षेत्र होते. रत्नागीरी जिल्ह्यातील अवघ्या वीस गुंठयाचे धारणक्षेत्र तीन तुकडयात विभागलेले होते. ठाणे जिल्ह्यातील एक एकर नउ गुंठयाचे धारणक्षेत्र चौदा तुकडयांचे मिळून झालेले होते. ही उदाहरणे देवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या सदर अभ्यासामध्ये खालील प्रमाणे अत्यंत महत्वाचे तीन प्रश्न उपस्थीत करतात.

१. धारणक्षेत्राच्या विखंडनामुळे साधन संपत्तीचा उपयोग कार्यक्षमपणे करण्यात अडचणी निर्माण होत असताना सुध्दा मुळात असे विखंडण होण्याचे करण काय?

२. मोठी धारणक्षेत्रे कार्यक्षम व लहान धारणक्षेत्र अकार्यक्षम ही वस्तूस्थीती खरी आहे का? किफायतशीर धारणक्षेत्र कसे ठरवायचे?

३. भारतातील लहान व विखुरलेल्या धारणक्षेत्रामुळे निर्माण झालेल्या समस्येवरील अंतीम उपाय कोणता ?

भारतीय शेतजमीनीच्या लहान आकारमाना संदर्भात वरील प्रकारचे प्रश्न उपस्थीत करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या उत्तरापर्यंत जातात.

पहील्या प्रश्नासंदर्भात ते म्हणतात की, वारसा हक्क हे जमीनीच्या विभाजनाचे मुख्य कारण नसून लोकांना शेती व्यतीरिक्त उपजिवीकेचे दुसरे साधन उपलब्ध नसल्यामूळे शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचा अतिरिक्त भार शेतीवर पडलेला आहे. त्यामुळे लोकांची अशी धारणा निर्माण झाली आहे की, अजीबात नसण्यापेक्षा लहानसा का असेना पण शेतजमीनीचा तुकडा आपल्या मालकीचा असला पाहीजे. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, लोकांना अधिक किफायतशीर असा उपजीवीकेचा दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध करून दिला गेला तर लोक निश्चितच जमीनीचे लहान – लहान तुकडे करण्याचे सोडून देतील.

दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, शेती हा उत्पादनाचा उपक्रम असल्यामुळे किफायतशीर धारणक्षेत्र उपभोगाचा निकष लावून न ठरवता उत्पादनाचा निकष लावून ठरवला गेला पाहीजे. केवळ जमीनीचे आकारमान ही अर्थशास्त्रीय दृष्टया निरर्थक संकल्पना आहे. मोठी धारणक्षेत्रे किफायतशीर व लहान धारणक्षेत्रे अकिफायतशीर असतात असे म्हणने चुकीचे ठरेल. कारण धारणक्षेत्र किफायतशीर की अकिफायतशीर ही गोष्ट दिलेल्या धारणक्षेत्राची मशागत करण्यासाठी आवश्यक असलेले इतर उत्पादक घटक योग्य प्रमाणात उपलब्ध आहेत किंवा नाहीत यावर अवलंबून असते. त्यामुळे लहान धारणक्षेत्र ही शेतीची समस्या नसून, भांडवल व तत्सम साधन सामग्रीचा तुटवडा ही खरी समस्या आहे. भारतीय शेतीमधून अतिरिक्त उत्पादन न झाल्यामुळे भांडवलाचा तुटवडा निर्माण होणे ही शेतीची खरी समस्या आहे.

तिसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, शेती क्षेत्रातील ही समस्या सोडवण्यासाठी औद्योगीकरण हा एकच खात्रीलायक उपाय आहे. कारण औद्योगीकरणाचे संचयी लाभ होतात. शेती क्षेत्रातील अनावश्यक व बेकार क्षेत्र उत्पादक अशा बिगर शेतीक्षेत्रात सामावून घेतले गेल्यामुळे अशा श्रमांना यापुढे दुसऱ्याच्या श्रमावर अथवा मिळकतीवर उपजीवीका करण्याचे कारण नाही. त्यामुळे शेत जमीनीवर अवलबून असनाऱ्या लोकांचा अतिरिक्त भार कमी करण्यास मदत होईल.

मुंबई कायदेमंडळात ऑक्टोबर १९२७ मध्ये एफ. जी. एच. ॲन्डरसन यांनी ''स्मॉल होल्डर्स रिलीफ बिल'' मांडले होते. या बिलाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कडाडून विरोध केला. विरोधाचे कारण असे होते की, ॲन्डसन यांनी मुंबई राज्यातील शेती व्यवसायाला भेडसावणाऱ्या 'विखुरलेली धारण क्षेत्रे' व अशा धारणक्षेत्रांचे लहान आकरमान यावर उपाय सुचवण्यासाठी दोन प्रकारच्या तरतुदी सुचवलेल्या होत्या. एक स्थावर मालमत्तेच्या प्रामुख्याने जमीनीच्या विभाजनावर नियंत्रण, तर दुसरी एकसंघ धारणक्षेत्रांची विक्री. ॲडरसन यांच्या

बिलानुसार एका विशिष्ट आकराच्या धारणक्षेत्रापेक्षा कमी धारणक्षेत्र कसणाऱ्या शेतकऱ्याला शिक्षेची तरतुद करण्यात आली होती. तसेच छोटया आकाराची धारणक्षेत्रे अस्तीत्वात आणण्यास प्रतिबंध घातला गेला होता. ॲंडसन यांच्या या अन्यायकारक बिलामुळे शेतकऱ्यांच्या संपत्तीच्या अधिकारावरच गदा येणार होती. तर जमीनदारांची भरभराट होणार होती. यांची किंमत मात्र लहान शेतकऱ्यांना मोजावी लागणार होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ॲडरसन यांच्या या बिलाची यासाठी भिती होती की, या बिलानुसार धारणक्षेत्राचा एक विशिष्ट व ठरावीक आकार असावा अशी कायदेशीर तरतुद झाली असती तर लहान शेतकऱ्यांना आपल्या शेतजमीनी मोठया शेतकऱ्यांना विकल्या शिवाय पर्याय राहणार नाही. परीणामी लहान शेतकरी भूमीहीन शेतमजूर होतील.

ॲडरसन यांच्या अन्यायकारक बिलाला पर्याय म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी शेतीचा आग्रह धरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, लहान व विखुरलेल्या धारणक्षेत्राच्या समस्येवर सहकारी शेतीचा पर्याय महत्वाचा आहे. एका विशिष्ट आकाराची सहकारी शेती अस्तीत्वात आणली तर लहान शेतकऱ्यांना त्यांच्या होणाऱ्या विनाशापासून वाचविता येईल आणि ॲडरसन यांनी मांडलेल्या विद्येयकातील उद्दीष्टे ही साध्य करता येतील. सहकारी शेतीमुळे शेतकऱ्यांचा आपल्या शेतजमीनी वरील मालकी हक्क कायम राहील आणि शेतजमीनीच्या आकारमानामध्ये ही वाढ होईल.

मुंबई राज्यातील रत्नागिरी, ठाणे व कुलाबा जिल्हयामध्ये 'खोती' ही एक भूधारणा पध्दती होती. खोती पध्दतीमध्ये शेतसारा गोळा करण्यासाठी शासनाने खोताची नेमणूक केली होती. हा खोत शेतसाऱ्याची विशिष्ट रक्कम सरकारच्या तिजोरीत भरून झाले की, शेतकऱ्यांशी वाटेल तसे वर्तन करीत असे अशा प्रकारचे वर्तन करण्याचे स्वातंत्रच खोताला मिळालेले होते. खोताच्या जुलूम जबरदस्ती मूळे शेतकऱ्यांची परिस्थीती अत्यंत हालाखीची होती.खोताच्या जुलूम — जबरदस्तीचा परिणाम म्हणून खोता विरोधात असंतोषाची लाट निर्माण झाली. आणि शेतकऱ्यांनी तीन खोतांना ठार मारून खोती पध्दती नष्ट करण्याची मागणी लावून धरली. या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहीले व १७ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबई विधिमंडळात खोती पध्दती रद्द करण्यासाठी एक विद्येयक मांडले. व अल्पभूधारक असणाऱ्या बहुसंख्य शेतकऱ्यांचे शोषण करणारी ही जुलमी पध्दत रद्द करण्याची मागणी केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विद्येयकामुळे खोताची उचलबांगडी होवून शेतकरी व सरकार अस प्रत्यक्ष संबंध निर्माण होणार होता. आणि शेतकऱ्यांचे शोषण थांबणार होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खोतालाही वाऱ्यावर न सोडता त्याला सरकारने योग्य नुकसानभरपाई द्यावी आणि खोती पध्दतीचा अंत करावा अशीही तरतूद आपल्या विद्येयकात केली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४६ मध्ये 'ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट फडरेशन' च्या वतीने घटना समीतीला 'स्टेट्स ॲन्ड मायनॉरिटीज' या नावाचा एक मसुदा सादर केला होता. सदर मसुद्यामध्ये अल्पसंख्यांकांच्या संरक्षणाबरोबरच स्वतंत्र भारताच्या आर्थिक विकासाचा व पुनर्रचनेचा आराखडा तयार करून शेती हा 'शासकीय उद्योग' असावा अशी भूमीका मांडली होती.

देशातील पायाभूत उद्योग आणि विमा याप्रमाणेच देशातील सर्व जमीन शासनाने आपल्या ताब्यात घ्यावी. ज्यांची जमीन ताब्यात घेतली जाईल त्यांना योग्य नुकसान भरपाई देण्यात यावी. शेत जमीनीचे विशिष्ट आकाराचे भाग करून गावातील लोकांना कसण्यासाठी उपलब्ध करून देण्यात यावी. यासंदर्भात प्रश्न निर्माण होवू नयेत म्हणून शासनामार्फत कांही अटी लादल्या जाव्यात.

१. शासनाने तयार केलेल्या नियमानूसार व मार्गदर्शक तत्वानुसारच शेती कसण्यात यावी.

२. सामुदायीक शेतीमध्ये जात व तत्सम कोणत्याही गोष्टीच्या आधारे भेदभाव न करता सर्वांना सामावून घ्यावे.

३. शेती उत्पादनाचा ठरलेला वाटा सरकारला दिल्यानंतर शिल्लक राहीलेले उत्पन्न जमीन कसणाऱ्या ग्रामस्थांनी आप—आपसात वाटणी करून घ्यावे.

शेती उत्पादनावर शेतसारा, जमीनदारांना द्यावयाची नुकसान भरपाई व शासनाने पुरवलेल्या भांडवलाचा वापर यासाठी कर आकारणी करणे आणि सामुदायीक शेतीच्या अटींचा भंग करणाऱ्या किंवा इतर कोणत्याही प्रकारे सामुदायीक शेतीच्या तत्वांना बाधा पोहोचवणाऱ्या सभासदांना योग्य शिक्षा करण्याचे अधिकार सरकारकडे असावेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ही योजना सर्वाच्या हिताची होती. यामुळे लहान भूधारणेचा प्रश्न कायमचा मिटणारा होता. कारण यामुळे गावात कोणीही जमीनदार, कोणीही कुळ आणि कोणीही शेतमजूर न राहता सर्वाचा समान अधिकार राहीला असता. निसर्गाने निर्माण केलेली शेतजमीन ही कोणाच्या तरी लाभाचे आणि कोणाच्यातरी शोषणाचे साधन राहीले नसते.

❑❑❑